अर्ज (उपदान) क्र. ८/२०२६

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : १७/०२/२०२६ |
| नोंदणी दिनांक | : १७/०२/२०२६ |
| निकाल दिनांक | : ०६/०३/२०२६ |
| कालावधी | : २८ दिवस |
| सीएनआरनं | : एमएचएलसी०६००००२१२०२६ |

## मे. कामगार न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे कोर्टात
## श्री. गौ. स. हांगे, न्यायाधीश यांचेसमोर

अर्ज (उपदान) क्र. ८/२०२६

राकेश रमेश कचरे
रा. धनकान्हे, पो. देवकान्हे,
ता. रोहा, जि. रायगड .. अर्जदार

विरुध्द

मे. रॅपटेकोस ब्रेट ॲण्ड कंपनी लि.,
१००/२, एमआयडीसी धाटाव,
रोहा-रायगड. .. सामनेवाले

अर्जदारातर्फे :- वकील, श्री. विजय मेहता.

:: **आ दे श** ::

(दि. ०६/०३/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला कंपनीने या न्यायालयात जमा केलेली रक्कम मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार याच्या म्हणण्यानुसार अर्जदार हा सामनेवाले मे. रॅपटेकोस ब्रेट ॲण्ड कंपनी लि., यांच्याकडे दि. ०१/०६/२०१६ ते दि. २८/०३/०२५ या कालावधीपर्यंत काम करत होता. दि. २८/०३/२०२५ रोजी अर्जदार यांना कामावरुन कमी करण्यात आले. कामावरुन कमी केल्यानंतर सामनेवाला यांनी दि. २६/०६/२०२५ रोजी रक्कम रु. ६९,७०७/- चा चेक अर्जदार यास स्पीड पोस्ट द्वारे पाठविला, परंतू अर्जदार त्यावेळेस तो स्विकारण्यास अक्षम होते. त्यानंतर सामनेवाला यांनी कामगार न्यायालय, अलिबाग येथे उपदान रक्कम रु.६९,७०७/- मे. कोर्टात भरलेली आहे. सदर रक्कम या न्यायालयात सी. नं. ६/२०२५-२६, दि.०१/१०/२०२५, प्रमाणे जमा केलेली आहे.

३. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र, आधारकार्डची प्रत, पॅनकार्ड ची प्रत व बॅंक पासबुक ची प्रत व अॅनेक्शर ए असे कागदपत्र याकामी दाखल केले आहेत. या न्यायालयाचे वरिष्ठ लिपीक यांच्या अहवालाचे अवलोकन करता अर्जदाराच्या नांवे रक्कम रु. ६९,७०७/- एमडीआर खाते क. ०४३१०३०००३७२८२ या द्वारे बॅंक ऑफ बडोदा शाखा महाड येथे मुदत ठेवीमध्ये गुंतवील्याचे दिसून येत आहे. सदर रक्कम अर्जदाराचे नावे गुंतविली असल्याने ती रक्कम त्यांना मिळणे योग्य आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

:: **आ दे श** ::

१. अर्जदार यांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार याच्या नावे मुदतठेवीमध्ये ठेवण्यात आलेली रक्कम रु.६९,७०७/- (अक्षरी एकोणसत्तर हजार सातशेसात रू मात्र) सदर रक्कमेवरील व्याज त्यांना त्यांची ओळख पटवून एनईएफटी / आरटीजीएस द्वारे अर्जदाराच्या बॅंक खात्यात जमा करावी.

३. खर्चाबद्दल आदेश नाही.

HANGE GAURAV SADASHIV
Digitally signed by HANGE GAURAV SADASHIV
Date: 2026.03.07 16:27:00 +0530

( गौ. स. हांगे)
न्यायाधीश,
रायगड-अलिबाग

ठिकाण :- अलिबाग
दि. ०६/०३/२०२६

टंकलीखीत केले - ०६/०३/२०२६
पिठासीन अधिकारी सही - ०६/०३/२०२६